
अमर चित्र कथा

अल्बर्ट आईनस्टाईन

संख्या ७७७ | रु. ९९

www.amarchitrakatha.com



शोध आपल्या संस्कृतीचा

आपल्या जडणघडणीच्या काळाकडे जेव्हा अनेक भारतीय मागे वळून पाहतात, तेव्हा ते त्यांच्या मनावर '**अमर चित्र कथा**'यांच्या चित्ररूपी पुस्तकांनी केलेले संस्कार महत्वाचे मानतात. याच अमर चित्र कथांच्या माध्यमातून त्यांना आपल्या गौरवशाली परंपरेची पहिली ओळख झाली.

१९६७ सालापासून आजपर्यंत अमर चित्र कथांची ४५० पेक्षा अधिक पुस्तके प्रसिध्द झाली असून, आजपर्यंत नऊ कोटींपेक्षा जास्त प्रतींची विक्री संपूर्ण जगभरात झाली आहे.

आज संपूर्ण भारतात १००० पेक्षा अधिक ग्रंथदालनांमध्ये अमर चित्र कथा उपलब्ध आहेत. आपल्या जवळच्या ग्रंथदालनाचा पत्ता जाणून घेण्यासाठी **www.ack-media.com** या संकेतस्थळावर संपर्क करावा. जर ग्रंथदालनात प्रती उपलब्ध नसतील तर, आपण आमचे ऑनलाइन ग्रंथदालन **www.amarchitrakatha.com** येथून सुध्दा पुस्तके मिळवू शकता. तेथून पुस्तकांचे वितरण जगभरात कोठेही त्वरीत केले जाते.

आमच्या या पुस्तकांच्या खजिन्यातून आपले आवडीचे पुस्तक निवडण्यासाठी आम्ही आपल्या सोयीकरीता पुस्तकांची सहा गटात विभागणी केली आहे.

महाकाव्य व पौराणिक
महाकाव्ये आणि पुराणांतील प्रसिध्द कथा

अभिजात भारतीय साहित्य
भारतीय साहित्यातील मनोहारी कथा

बोध आणि विनोद
लोककथा, दंतकथा, बोधकथा आणि विनोदी कथा

वीरगाथा
शौर्यवान भारतीय स्त्री-पुरूषांच्या कथा

युगनिर्माता
भारतीय विचारवंत, समाज सुधारक आणि राष्ट्रनिर्मात्यांच्या कथा

समकालीन अभिजात साहित्य
आधुनिक भारतीय साहित्यातील सर्वोत्कृष्ट कथा

Script
Venu Gopal

Illustrations
Souren Roy


Editor
Anant Pai

Amar Chitra Katha Pvt Ltd

ISBN 978-93-91319-03-8
Published by Amar Chitra Katha Pvt. Ltd., Mumbai 400059, India.
For Consumer Complaints Contact Tel : +91-22 49188881/2
Email: customerservice@ack-media.com
Printed in India



* पश्चिम जर्मनीतील शहर


आईन्स्टाईन !
तू माझ्या मागून बोलत का नाही आहेस ? ३x३ म्हणजे किती ?
म...म...
आत्तापर्यंत पाहण्यात आलेल्यापैकी हा सर्वात संथ मुलगा आहे.
जा! बाहेर जा !
आणि दिवसभर बाहेरच उभा रहा.


चला पुढे जाऊया...
३x३ =९
३ x४ =१२
तीच गोष्ट परत परत...
हे काय चाललंय?
मला वाटते मी घरी जायला हवे.
कडक शिक्षक आणि खोडकर मुलापासून रक्षण करण्यासाठी घर हे त्यांचं आश्रयस्थान होतं. त्याची धाकटी बहीण माया त्यालाही प्रेमाने मिठी मारे.
आई, अल्बर्ट आलाय.
मग तो आईबरोबर जेवायला बसला.
बास आई बास.
त्याच्या सुदैवाने तो नातेवाइकांसोबत विविध ठिकाणी फिरायला जात होता. अशाच एका प्रसंगी –
अल्बर्टकडे बघ, तो एकटक आकाशात काहीतरी बघतोय. तो कशातच रस घेत नाहीये.



बाकीची मुलं बघ. हसतायत, खेळतायत, एकमेकांना चिडवतायत.
माझी लहान एल्सा त्याच्याच वयाची आहे, किती आनंदी आहे ती. कोण म्हणेल ही चुलत भावंडे आहेत म्हणून ?
रुडी, तुला अल्बर्ट माहीत नाहीये.
त्याला शांत बसून विचार करायला आवडते. बघ. तो एक दिवस नक्की प्राध्यापक बनेल.
प्राध्यापक, ओह... ?
बिचारी पॉलिनी ! ती हे मान्य करणार नाही की अल्बर्ट गतिमंद आहे.
अनेकांना त्याची जाणीव होती. अल्बर्ट नेहमी त्याच्याच विश्वात गुंग असायचा.
तो फक्त संगीतात रस घ्यायचा.


अल्बर्ट!
तू तिकडे काय करतोयस ? तू झोपायला का नाही गेलास ?
आई, मला गाणं ऐकायचंय.
त्याला गायनाचा किंवा व्हायोलीनचा क्लास लावायचा का ?
अल्बर्टने व्हायोलिन-वादनाचे प्रशिक्षण घ्यायला सुरुवात केली. एके दिवशी संध्याकाळी –
आज तुझा क्लास नाहीये ?
आहे की...
पण ते एकच गोष्ट परत परत शिकवतात. ते खूप कंटाळवाणं आहे.
नंतर एके दिवशी त्याच्या पालकांच्या लक्षात आलं, संगीताशिवाय त्याला अजून एका गोष्टीत रस आहे. तो सर्दीने आजारी होता व त्याचे बाबा नुकतेच कामावरून परत आले होते.
कसा आहे तो ?
तब्येत ठीक आहे, पण खूप उदास दिसतोय. मला काळजी वाटते.


अल्बर्ट! तुझ्यासाठी एक छानशी भेट आणलीय. जादुई सुईचा बॉक्स .. तुला आवडेल.
हा बॉक्स तू कोणत्याही दिशेला वळव, पण ही सुई मात्र एकच दिशा दाखवते.
COMPASS
ह्याला होकायंत्र म्हणतात.
COMPASS
कमाल आहे, पण ही सुई याच दिशेला का राहते ?
अल्बर्ट, ते पृथ्वीच्या चुंबकत्वाशी संबंधित आहे.
म्हणजे... काय ?
चुंबकत्व. एका अदृश्य शक्तीचं नाव.
बाबा, हे चुंबकत्व काय असते ?
नंतर जॅकोब * काकांना विचार.


* हरमानचा लहान भाऊ


एक अदृश्य शक्ती...
जी सुईला हलवते.
आई बाहेरून आली तेव्हा –
त्याच्या गालांवर लाली आणि डोळ्यातं चमक होती. याआधी याला असं मी कधीच बघितलं नाही.
अल्बर्ट, आता विश्रांती घे. किती वेळ या होकायंत्राशी खेळशील ?
होकायंत्राने अल्बर्टच्या भावविश्वात स्थान मिळवले. त्याच्यातल्या जिज्ञासेला जागृत केले.
शाळेत मात्र तो वर्षानुवर्षे संथच राहिला.
मी तुला प्रश्न विचारला. काहीतरी बोल.... नुसता बघत काय राहिलायस.
उत्तर बरोबर आहे याची खात्री झाल्याशिवाय तो उत्तर देत नाही सर.
हाहाहा !
तो प्रामाणिक आहे, जॉन !
ते खरंच होतं. त्या वयातसुद्धा त्याने कधी अस्पष्ट, निरर्थक उत्तर दिलं नाही. बोलतानाही ते खूप सावकाश एकेक शब्द उच्चारायचा.


दहा वर्षांचा असताना त्याने लिओपोल्ड जिम्नॅशियमला *
जायला सुरुवात केली.
ते किती विषयांचा अभ्यास करायला लावतात!
लॅटिन व फ्रेंचचा अभ्यास मी का करू ? शिक्षक बोलतात त्यातला एकही शब्द मला कळत नाही.
तो प्रश्न विचारून भंडावून सोडत असे.
इतिहासात सनावळी लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे.
पण का सर ?
आपल्याला गरज असेल तेव्हा त्या तारखा पुस्तकात बघू शकतो की ?
खाली बस. मूर्ख मुला!
त्याचे शिक्षक प्रश्नांची उत्तरे देत नसत. अपवाद एकच - त्याचे
काका जॅकोब. एके दिवशी –
काका बीजगणित म्हणजे काय ?
बीजगणित एक मस्त शास्त्र आहे.
जेव्हा आपण एखाद्या लहान प्राण्याची शिकार करायला जातो जेव्हा त्याचे नाव माहीत नसते त्याला आपण 'क्ष' म्हणतो.

* माध्यमिक शाळा


जेव्हा आपण झेप घेऊन प्राण्याला पकडतो, तेव्हा आपण त्या 'क्ष'ला योग्य नाव देतो.
त्याच्या काकांच्या स्पष्टीकरणाने अल्बर्ट एवढा मोहित झाला की, त्याने स्वत: बीजगणिताचा अभ्यास करायला सुरुवात केली.
जेव्हा इतर मुले अंकगणिताशी झगडत असत, तेव्हा अल्बर्ट मात्र त्या विषयातील प्रश्न सहजपणे सोडवून दाखवे.
एके दिवशी त्याला वरच्या वर्गातील भूमितीचे पुस्तक मिळाले.
दोन आठवड्यात त्याने त्या विषयात प्रभुत्व मिळवले आणि पुस्तकातील सगळे प्रश्न सोडवले.
आता त्याला वाचनातला आनंद मिळू लागला. प्राथमिक शाळेत शब्द एकत्र वाचणे त्याला कठीण जात होते, आता तेच त्याला फायद्याचे वाटले. त्याच्या मनात येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तो स्वत:च शोधू लागला.
अच्छा अशाप्रकारे ढग तयार होतात तर.
शाळेच्या शेवटच्या वर्षी, जेव्हा अल्बर्ट पंधरा वर्षांचा होता, तेव्हा त्याच्या वडिलांना व्यवसायात मोठा धक्का बसला.
आता हाच व्यवसाय पुढे करत राहण्यात काही फायदा नाही. दुसऱ्या शहरात जाऊन नवीन सुरुवात करायला हवी. आपण मिलानला जाऊया.
मिलान ?
पण मुलांचं काय ? माया नक्कीच जुळवून घेईल पण....
हो मला कल्पना आहे. अल्बर्टसाठी हे कठीण जाईल.



नवीन शहर .. नवीन शाळा .. यांमुळे त्याच्या अभ्यासावर, मनावर विपरित परिणाम होईल.
मग काय करायचं, पॉलिन ?
त्याला इथेच ठेवूया. पुढच्या वर्षी पदवीधर झाला की येईल मिलानला.
अल्बर्ट तिथल्याच एका वसतिगृहात राहू लागला. शाळा पहिल्यासारखी सुरू होती.
पण आता त्याला हरवल्यासारखं वाटत होतं. त्याचे शिक्षक त्याच्याशी कठोरपणे वागत होते आणि संध्याकाळी पळून जाण्यासाठी घरीसुद्धा कोणी नव्हतं.
हा बघ आला 'प्रामाणिक जॉन'।
हाहाहा !
त्याला गणितात चांगले गुण मिळायचे, पण इतर विषयात दयनीय अवस्था होती.
मी जे लिहिलं आहे ते वीस वेळा लिहून काढ.
हे तर एकच गोष्ट परत परत लिहायला सांगून सक्तीने ते ज्ञान डोक्यात घालण्याचा प्रयत्न करत आहेत.
उद्यासुद्धा हीच गोष्ट पुन्हा करावी लागणार, कुणाला कंटाळा कसा येत नाही ! कधी माझी या सगळ्यांतून सुटका होईल, देव जाणे.


एके दिवशी वर्गात –
सर, मी एक प्रश्न विचारू ?
नाही ! मी जे काही लिहिलंय ते लिहून घे, शाळा संपल्यावर मला भेट.
शाळा संपल्यावर –
तुम्ही मला बोलावलंत, सर.
हो
हे बघ आईन्स्टाईन, मी तुझ्या प्रश्नांना कंटाळलो आहे. माझ्या क्लास मध्ये तू मला प्रश्न विचारू नकोस अशी विनंती करतो. त्याची उत्तरे नाही आहेत माझ्याकडे.
मला वाटतं तू शाळा सोडून द्यावीस. त्यातच तुझं भलं आहे. तसंही तू तुझ्या आयुष्यात फार काही करू शकशील, असे वाटत नाही.
लवकरच या अपमानास्पद, रटाळ, एकाकी आयुष्याला कंटाळलेल्या अल्बर्टने शाळा व शहर सोडून थेट मिलानला जाणारी ट्रेन पकडली...
अल्बर्ट आपल्या जीवाभावाच्या माणसांकडे परत आला.
अल्बर्ट, तू किती वाळलायस !










पुढचे काही महिने अल्बर्टसाठी आनंदाचे होते. कडक शिस्तीचे शिक्षक नाहीत, असंवेदनशील मित्र नाहीत, की रटाळ शाळा नाही. तो इटलीतील ग्रामीण भागात फिरला.




मी पुन्हा जिम्नॅशियमला जाणार नाही. तो तुरुंगवास आहे माझ्यासाठी!
एकदा तो आईबरोबर संत मारिया चर्चमध्ये गेला. तिकडे –
आई, येशूच्या आयुष्यातील अखेरचे भोजन या विषयावरचे ते पेंटिंग किती छान आहे, पण दा-व्हिन्सीचे ते अद्भूत रंग उडायला सुरुवात झाली आहे.
कारण ते चित्र चारशे वर्षांपूर्वीचे आहे.
त्याहीपेक्षा जुनी चित्रे आहेत की इकडे, त्यांतील रंग अजूनही चांगले आहेत.
दा-व्हिन्सी प्रयोगशील होता. त्याने नव्या पद्धतीने तयार केलेले रंग वापरण्याचा धोका पत्करला.
आणि हे चित्र त्याला कुठच्या कुठे घेऊन गेले बघ. मळलेल्या वाटेवरून जाण्यापेक्षा त्याने नवा मार्ग चोखाळला.
लिओनार्दो दा व्हिन्सी हा अष्टपैलू माणूस होता, त्याने चित्रकला, शरीरशास्त्र, विज्ञान अशा अनेक विषयांत सातत्याने प्रयोग केले.
काही दिवसांतच अल्बर्टची सुट्टी संपली.
अल्बर्ट, तुझी तंत्र-विज्ञान शाळेत जायची इच्छा आहे का?
तू गणितात हुशार आहेस. तू इंजिनिअर होऊ शकतोस.
मी...


जॅकोबच्या मते, झुरीच पॉलिटेक्निक ही युरोपातली उत्तम शाळा आहे.
चालेल, मी तिकडेच प्रवेश घेतो.
अल्बर्ट झुरीचला गेला आणि स्विस फेडरल पॉलिटेक्निकच्या प्रवेश परीक्षेला बसला.
दोन दिवसांनंतर त्या संस्थेचे अध्यक्ष डॉ. हेरझोग यांनी त्याला बोलावून घेतले.
अरे !
आईन्स्टाईन, निकालावरून तू अजून पॉलिटेक्निकसाठी तयार नाहीस असे दिसते.
मला माफ करा, निकाल खूप वाईट आलाय. तुम्ही दाखवलेल्या संयमाबद्दल आभारी आहे.
या मुलामध्ये काहीतरी आहे.
थांब, आईन्स्टाईन.
मला माहीत आहे की तू भौतिकशास्त्रात आणि गणितात हुशार आहेस.
हो, सर ?
मग मी सांगतो ते कर. आधी शाळेत जा. कच्च्या विषयाचा कसून अभ्यास कर आणि मग पदवीधर झाल्यावर आमच्याकडे ये. तुला इथे नक्की प्रवेश देऊ.


तू तुझ्या आयुष्यात काहीही करू शकणार नाहीस.
परत तिकडे जायचं नाही !... मग मी काय करू शकतो ? आई, बाबांना काय सांगू.
अल्बर्टने अनिच्छेने झुरीचपासून ३५ मैलांवर असलेल्या असरू शहरातल्या शाळेत प्रवेश घेतला. हा एक योग्य निर्णय ठरला.
इथले शिक्षक किती वेगळे आहेत! ते आम्हाला अट्टाहासाने काही शिकवत नाहीत.
..... ते विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य देतात.
अल्बर्टने ९ महिन्यांतच डिप्लोमा पूर्ण केला.


स्विस फेडरल पॉलिटेक्निकमध्ये त्याला प्रवेश मिळाला. एका श्रीमंत काकांनी महिन्याचा खर्च भागवण्यासाठी दरमहा चारशे फ्रँक देण्याचे मान्य केले. आता तो १७ वर्षांचा झाला होता.
भौतिकशास्त्राच्या प्रयोगांत तो तासनतास बुडून जाई.
मला वाटलंच होतं, तू इथे असशील. हल्ली तू गणिताची लेक्चर्स का बुडवतो आहेस ?
मि. ग्रॉसमन, मला हा प्रयोग पूर्ण करायचा आहे.
मला गणित खूप अवघड वाटतंय, त्यात भरपूर कीचकट सूत्रे आहेत.
ज्या विषयांचा अभ्यास करायला हवा होता त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. जेव्हा वार्षिक परीक्षा जवळ आली तेव्हा –
काय झालं, आईन्स्टाईन ? तू काळजीत दिसतोयस. परीक्षेबद्दल काही आहे का ?



मला परीक्षेची भीती वाटते! पुस्तकातील गोष्टींवर आधारलेले प्रश्न, पाठ केलेली उत्तरे... सगळा वैचारिक गोंधळ
!
मी याला कधी एवढं निराश नाही पाहिलं!
माझ्या खोलीत ये, आईन्स्टाईन. मला तुला काहीतरी दाखवायचय.
ही पुस्तके चाळून बघ
तू बुडवलेल्या लेक्चरर्सच्या नोट्स त्यांत आहेत. तुला त्याचा फायदा होईल
धन्यवाद.
ग्रॅसमॅनने दिलेल्या नोट्स कमाल होत्या. अल्बर्ट गणितासह सर्व विषयांच्या परीक्षेत उत्तीर्ण झाला.


काकांकडून मिळणारा पैसा हा त्याच्या गरजा भागवण्यासाठी पुरेसा नव्हता. पण आईन्स्टाईनला त्याचे वैषम्य वाटले नाही. तो काटकसरीने राहिला. तणाव घालविण्यासाठी किंवा विश्रांतीच्या वेळी तो मोझार्ट व बाखचे संगीत ऐकत असे वा स्वत: व्हायोलीन वाजवत असे.
अनेकदा संगीताच्या कार्यक्रमाला जाण्यासाठी तो उपाशी रहायचा आणि वाचवलेल्या पैशांतून तिकिटे खरेदी करायचा.
पॉलिटेक्निकमध्ये त्याला एक छान मैत्रिण लाभली, तिचं नाव मिलेवा.
आज सकाळी मी एक प्रयोग करत होतो आणि...
तीही तशी अबोलच होती, अल्बर्टचे बोलणे मन लावून ऐकायची.
हळूहळू त्यांच्यातली मैत्री बहरत गेली. कॉलेजच्या तिसऱ्या वर्षाला असताना –
मिलेवा आणि मी पदवीधर झाल्याझाल्या लग्न करायचे ठरवले आहे.
वा, खूपच छान!


आईन्स्टाईनमधली अलौकिक बुद्धिमत्ता ओळखणारा एकच प्राध्यापक होता तो म्हणजे मिन्कोवस्क !
आईन्स्टाईन तू माझी बरीच लेक्चर्स बुडवली आहेस.
प्रगत गणिताचा तुला तुझ्या क्षेत्रात खूप फायदा होईल.
मला माहीत आहे सर. पण मला तो विषय खूप कंटाळवाणा वाटतो.
आईन्स्टाईन पदवीधर झाला तेव्हा २१ वर्षांचा होता. त्याच दरम्यान त्याच्या आईवडिलांचे पत्र आले.
तुझ्या काकांनी पैसे पाठवणं थांबवलंय आणि तुझ्या वडिलांचा व्यवसायदेखील कसाबसा चालू आहे, तेव्हा तुझ्या आयुष्याचा निर्णय आता तुला घ्यायचाय....
आता मला नोकरी शोधायला हवी. मला बहुधा सहायक प्राध्यापक म्हणून पॉलिटेक्निकमध्ये नोकरी मिळू शकते.
पण त्याची निराशा झाली –
मला माफ कर आईनस्टाईन. तुझे भौतिकशास्त्रातील काम खूप चांगले आहे. तुला या विभागात ठेवायला मला आवडले असते. पण दुर्दैवाने सध्या जागा शिल्लक नाहीत.
एका तरुण, अननुभवी पदवीधराला नोकरी मिळणे किती कठीण आहे, या वास्तवाची त्याला जाणीव झाली.
केवळ पदवी असून काय फायदा ?



अल्बर्टचे बाह्यरूप अनाकर्षक होते. त्यामुळेही नोकरी देणाऱ्यांवर त्याची छाप पडत नसे. त्याचा कोट मळलेला असायचा, त्याने कधीच केस विंचरले नाहीत आणि बुटाला पॉलिश करणे, त्याला जणू माहितीच नव्हते.
DIRECTO
अशा परिस्थितीत मार्कल ग्रॉसमन त्याच्या मदतीला धावून आले.
माझ्या वडिलांनी बर्नमधील पेटंट ऑफिस-संचालकांबरोबर बोलणे केले आहे, त्यांना तुझा इंटरव्ह्यू घ्यायचाय.
मि. आईन्स्टाईन, हा किरकोळ जॉब आहे, मला मान्य आहे. पण तुला कामाची गरज आहे म्हणून मी शब्द ..
मार्कल, नोकरी ही नोकरी असते. मी इंटरव्ह्यू देऊन येईन.
तुला रेल्वे प्रवासासाठी पैसे लागतील. हे घेऊन ठेव.
मी तुमचे आभार कसे मानू, तेच कळत नाहीए.
बर्न पेटंट ऑफिसमध्ये, त्यांच्याकडे आलेल्या शोधप्रबंधांची व्यावहारिक वा व्यावसायिक शक्यता तपासण्यासाठी एक संशोधक-सहायक हवा होता.
तू स्वित्झर्लंडचा रहिवासी आहेस का?
हो, सर. माझा जन्म जर्मनीत झालाय, परंतु माझ्याकडे स्विस नागरिकत्वं आहे.
त्याला नोकरी मिळाली आणि त्याच्या करियरला सुरुवात झाली.
आम्ही याच्यासारखा माणूस याआधी कधी पहिला नाही. अवघड कामही तो सहजतेने आत्मसात करतो.


सकाळी दोन-तीन तासांत तो आपले काम पूर्ण करायचा आणि उरलेला वेळ स्वत:च्या कल्पनांवर चिंतन करत रहायचा.
प्रकाशाचा वेग विश्वातला कमाल वेग असून तो सर्वत्र स्थिर असतो ...
प्रकाशाच्या वेगावर स्वार होऊ पाहणारे त्याचे मन ... काळ, अवकाश, पदार्थ आणि ऊर्जा या मूलभूत संकल्पनांमधल्या एकवाक्यतेचा वेध घेऊ लागलं ..
दरम्यानच्या काळात त्याने मिलेवाशी लग्न केले आणि १९०४ मध्ये त्यांना पहिला मुलगा झाला.
बाळाला बाहेर घेऊन जायची वेळ झाली आहे.
वेळ सतत पुढे जात असतो का ?
हो.
प्रकाशाच्या वेगाचा उर्जेशी काय संबंध असावा ?
त्याने आपल्या वैज्ञानिक कामासाठी उर्जेचा उपयोग करण्यास सुरुवात केली.



* प्रतिष्ठित संशोधन नियतकालिक


त्याने त्याच्या आईला पत्र लिहिले –
"…. आई, तुझा हा मठ्ठ मुलगा शेवटी प्राध्यापक झाला तर.."
"...and so mama your dumbhead son has at last become a professor."
थोड्याच दिवसांत त्याच्या लक्षात आले की, ही नवीन नोकरी त्याच्या अपेक्षांना न्याय देणारी नाही.
माझा सगळा वेळ हा व्याख्याने, विद्यार्थी आणि ऑफिस कामातच जात आहे.
मला स्वत:शीसुद्धा बोलायला वेळ मिळत नाहीए. माझा सापेक्षतेचा सिद्धांत म्हणजे सुसज्ज होण्याची वाट पहात असलेले घर आहे …
मला अजून खूप काम करायचे आहे.
अल्बर्ट, या अशा मळक्या कपड्यांमध्ये तू विद्यापीठात कसा जाशील ? तू आता प्राध्यापक आहेस.
चांगल्या कपड्यांचा माझ्या कामाच्या गुणवत्तेशी काय संबंध ?
मी आहे त्या कपड्यातच ठीक आहे. वरवरच्या दिखाव्यापेक्षा आतलं जास्त मूल्यवान असतं, नाही ?


नंतर त्याने प्राग विद्यापीठात प्राध्यापक म्हणून काम केले आणि स्विस फेडरल पॉलिटेक्निक शाळेतही काम केले.
मिलेवाला आणि त्याच्या संशोधनाला जास्त वेळ देता यावा यासाठी त्याने अनेक नोकऱ्या बदलल्या.
नंतर १९१४मध्ये –
मिलेवा, बर्लिन येथील प्रशियन संस्थेकडून मला सदस्यत्व देण्यात आले आहे.
आता मला पूर्ण वेळ संशोधन करता येईल.
तू आणि तुझे संशोधन! आता खूप झाले! तुला जायचं तिथे जा पण मी आता झुरीच सोडून कुठेही येणार नाही!
अल्बर्ट दु:खी झाला, तो एकटाच बर्लिनला गेला.
मूलभूत संशोधनाला वाहून घेतलेल्या आईन्स्टाईनबरोबर संसार करणे मिलेवाला दिवसेंदिवस जड जाऊ लागले, परिणामी काही काळाने ते वेगळे झाले.



बर्लिनमध्ये त्याने भाड्याने घर घेतले व स्वत:ला कामात बुडवले.
आईन्स्टाईन मी तुला काहीतरी खायला घेऊन येऊ का ?
नाही, मला भूक नाही.
किती विचित्र माणूस आहे हा! त्याला आपण कसे दिसतो, कसे राहतो, काय व कधी खातो याच्याशी काहीच देणेघेणे नसते.
एके दिवशी तो त्याचे बर्लिन-निवासी काका रुडी यांच्या घरी गेला. तिकडे तो आपली चुलत बहीण एल्साला भेटला. एल्सा विधवा होती आणि दोन मुलांची आई होती.
अप्रतिम एल्सा, तू बनवलेल्या केकची चव खूपच छान आहे. माझी आईसुद्धा असाच केक करायची.
चव तिच्यासारखी असणारच. कारण केक बनवण्याचे धडे मी पॉलिनी काकूंकडूनच घेतले होते.
मग केक खाण्याच्या निमित्ताने आईन्स्टाईन वरचेवर एल्साकडे जाऊ लागला.
ऑगस्ट १९१४ मध्ये त्याने एल्साशी लग्न केले.
त्याचवर्षी त्याने व्यापक सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडला. पण जगाने त्याची दखल घेतली नाही, कारण युरोपीय आकाशात युद्धाचे ढग जमा झाले होते. लवकरच पहिल्या महायुद्धाची ठिणगी पडली.


बर्लिनमध्ये राहणाऱ्या आईन्स्टाईनला आपणच युद्धात ओढले गेल्याची जाणीव झाली.
हे युद्ध म्हणजे मानवतेवर, मानवी मूल्यांवर केलेला भीषण हल्ला आहे.
अल्बर्ट, बाहेर एक सरकारी अधिकारी तुला भेटायला आला आहे.
शुभ सकाळ प्राध्यापक. मी या देशातील आघाडीच्या ९२ विचारवंतांच्या संयुक्त घोषणेवर तुमची सही घ्यायला आलोय. या युद्धात जर्मनी निर्दोष असल्याचा निर्वाळा आपण सर्वांनी द्यायचाय.
मला माफ करा. मी या निवेदनावर सही करू शकत नाही.
काय!
आता परस्परांवर दोषारोप करण्यात अर्थ नाही. त्यापेक्षा शांतता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.
जर्मनीला निर्दोष मानण्यास नकार दिल्याने जर्मन सरकार आईन्स्टाईनवर नाराज झाले. तो दोस्त राष्ट्रांना फितुर असल्याच्या वावड्या उठल्या.
पहिले महायुद्ध १९१८ साली संपले आणि १९१९मध्ये लंडनच्या रॉयल सोसायटीच्या खगोलशास्त्रज्ञांनी आईन्स्टाईनच्या व्यापक सापेक्षतावादाला पुरावाजन्य पुष्टी दिली.


अल्बर्ट, हे रॉयल सोसायटीने पाठवलेले फोटो आहेत.
खूपच सुंदर!
आता तुझ्याकडे पुरावा आहे.
म्हणजे तुला काय म्हणायचंय?
तुझा सिद्धांत आता सर्वमान्य होईल. संशोधकांच्या शंका, संशय आता फिटतील.
अगं, एल्सा!
मला कधीच पुराव्याची गरज वाटली नाही. गरज त्यांना होती.
मग तू छान कशाला म्हणालास? मला वाटलं.....
ज्याने हे फोटो घेतले ना, त्याच्या कलेचं मी कौतुक करत होतो.
खरंय!


युद्धातील संहाराने त्रस्त झालेले जग विज्ञानाच्या मार्गाने नवीन वाटा धुंडाळणाऱ्या वैज्ञानिकांकडे आशेने पाहू लागले. आईन्स्टाईनला अनेक पुरस्कार मिळाले. १९२२ साली सगळ्यांत प्रतिष्ठित सन्मानाने त्याचा गौरव करण्यात आला.
आईन्स्टाईनला भौतिकशास्त्रासाठी नोबेल पारितोषिक मिळाले. आईन्स्टाईन जिंकला...
NOBEL
जर्मनीला त्याचा अभिमान वाटला आणि पुढच्या काही वर्षांत जर्मनीत आलेल्या प्रत्येक पर्यटकाला आईन्स्टाईनला भेटण्याची इच्छा असायची.
हा फोटोत दिसतो तसा नाही आहे?
दरम्यान जर्मनीतील परिस्थिती पुन्हा बिघडायला सुरुवात झाली. कट्टर राष्ट्रवाद्यांना जर्मनीच्या मानहानीचा सूड घ्यायचा होता.
J. COHEN & SONS
....आणि मानवतावादी, शांतताप्रिय आईन्स्टाईन राष्ट्रवादी नाझींचा लक्ष्य बनला.
कॅलिफोर्नियातील व्याख्यान दौऱ्यावर गेलेला असताना आईन्स्टाईलला एक गोष्ट समजली. त्याचा हितचिंतक म्हणाला –
अल्बर्ट, नाझी हिटलर जर्मनीचा सर्वसत्ताधीश झाला आहे.
NEWS



म्हणजे जर्मनीची शांतता धोक्यात आली आहे.
आता तिथे जाण्यात शहाणपणा नाही.
त्याने जर्मन संशोधन संस्थेला त्याचा राजीनामा पाठवला.
जर्मनीत राष्ट्रवादाला उधाण आले. नाझींनी त्याला देशद्रोही ठरवले आणि त्याच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांताचे जाहीर दहन केले.
आईन्स्टाईन पुन्हा घरी कधीच जाऊ शकला नाही. प्रदीर्घ युरोप दौऱ्यानंतर तो अमेरिकेला गेला आणि तिथेच स्थायिक झाला.
अमेरिकेत तो प्रिन्स्टन, न्यू जर्सी येथे प्रगत अभ्यास केंद्रात रुजू झाला. तिथल्या त्याच्या पहिल्या दिवशी –
तुम्हाला तुमच्या ऑफिससाठी अजून काही हवे आहे का ?
इथे सगळे काही आहे.
.... फक्त कचऱ्याची बादली नाहीये. मला अजून एक मोठी कचऱ्याची बादली आणा.
अजून एक ?
मला खाडाखोड करण्यासाठी खूप कागद लागतात.
१९३९ साली दुसऱ्या महायुद्धास तोंड फुटले. जर्मनी आधी अणु-बॉम्ब बनवेल या भीतीने, आईन्स्टाईनने त्याच्या सहकाऱ्यांसह अमेरिकन अध्यक्ष रूझवेल्टला पत्र लिहून सांगितले की, अमेरिकेने तातडीने स्वत:च्या अणु-विकास कार्यक्रमाला गती द्यावी.



६ ऑगस्ट १९४५ - अमेरिकेने जपानमधील हिरोशिमा व नागासाकी शहरांवर पहिला अणुबॉम्ब टाकला आणि सारे जग हादरले.
अणुबॉम्ब-निर्मितीला अप्रत्यक्षरीत्या आपण कारणीभूत ठरलो, या जाणिवेने शांतताप्रिय आईन्स्टाईनला अतीव दु:ख झाले.
हे परत होऊ नये म्हणून त्यापासून बचाव करण्यासाठी एकाच उपाय आहे तो म्हणजे जागतिक सरकार स्थापन करणे.
आणि तेव्हापासून तो जागतिक सरकारसाठी प्रयत्नशील राहिला.
आयुष्याची शेवटची वर्षं त्याने तरुणांना मार्गदर्शन करण्यात, अध्यापनात आणि युनिफाईड फिल्ड सिद्धांताच्या माध्यमातून सर्व भौतिक संकल्पनांचे स्पष्टीकरण देता येईल का, यावरील संशोधनात घालवली.
१८ एप्रिल १९५५ रोजी वयाच्या ७६व्या वर्षी या महामानवाने शेवटचा श्वास घेतला.


दुरदर्शी


अल्बर्ट आईनस्टाईन


अल्बर्ट खूपच लहान होता तेव्हा अभ्यासाबद्दल आवड नसल्यामुळे त्याचे पालक व शिक्षक निराश झाले. मुख्य म्हणजे, त्याला भाषणात अडचणी आल्या आणि दुर्लक्ष केले. अल्बर्टला शाळेत ज्या प्रकारचे शिक्षण मिळत होते त्याचा राग होता - तारखा आणि मजकूर लक्षात ठेवणे इ. परंतु तो जसजसा मोठा होत गेला तसतसा लवकरच हे स्पष्ट झाले की, अल्बर्ट सामान्य व्यक्ती नव्हता. १९०५ हे साल त्याच्यासाठी "जादुई वर्ष" म्हणून ओळखले जाते,त्यावर्षी त्यांनी एक नव्हे तर चार नवीन संशोधन पेपर चार भिन्न विषयांवर प्रकाशित केले. एका रात्रीत तो, त्याच्या पिढीतील सर्वात प्रसिद्ध वैज्ञानिक झाला.





























www.amarchitrakatha.com

ISBN 978-93-91319-03-8

9 789391 319038